॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

**Phone: (02462) 215294** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. समन्वय/उ.प.२०२६/२०२५-२६/८७४९ दिनांक : ०१/०४/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित कला महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: बी.ए. अभ्यासक्रमाच्या जुन्या विषयगट (Old Subject Group) बाबत.
संदर्भ : १) मा. संचालक, परीक्षा विभाग यांचे परीक्षा/पदवीकला/२०२२-२३/१९८४, दिनांक २४/११/२०२३ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून बी.ए. अभ्यासक्रमास नवीन Subject Group लागू करण्यात आलेले आहेत. त्यामुळे जून्या विषयगटानुसार परीक्षा देण्याच्या विद्यार्थ्यांच्या संधी संपलेल्या आहेत.

बी.ए. व्दितीय व तृतीय वर्षात जून्या ग्रुपचे कांही विद्यार्थी नवीन ग्रुपमध्ये प्रवेशित असल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे कांही विषय वेळापत्रकात Overlap होत आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून केवळ उन्हाळी-२०२६ परीक्षेकरीता सदर विद्यार्थांना एका वेळेत दोन पेपर किंवा विषयांची परीक्षा देण्यास मान्यता दिलेली आहे. तरी अशा संबंधीत विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी ०२ तासांचा वेळ वाढवून देण्यात यावा. (सकाळच्या सत्रात एका विद्यार्थ्यांचे दोन पेपर एकाच वेळेत येत असतील तर सकाळी १० ते दुपारी १२ व दुपारी १२ ते ०२ या कालावधीत सदर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात यावी.). सदर दोन्ही विषयाची प्रश्नपत्रिका एकाच वेळेत डाउनलोड करून पहिल्या कोडची परीक्षा दिल्यानंतर दुसरी प्रश्न पत्रिका देण्यात यावी, एकदाच दोन्ही प्रश्न पत्रिका देण्यात येवू नये. सदर सूचना /माहिती सर्व संबंधीत विद्यार्थी, प्राध्यापक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:
विभाग प्रमुख, संगणक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.